# मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई

९. हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर, बोरीबंदर, मुंबई
दुरध्वनी क्रमांक – २२०७५७५२ ईमेल क्रमांक mactmumbai1@gmail.com

---

क्रमांक -२९८/मोअदान्या / मुंबई /आस्था /२०२१ दिनांक - १३.०५.२०२१

प्रति,

मा. अध्यक्ष, बार असोसिएशन,
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
मुंबई.

विषय : मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई येथे विशेष सरकारी वकील यांची नियुक्ती करण्याबाबत.

संदर्भ : १. एमसीटी-०१२१/प्र.क्र.०१०/परि-५ दि.२७.०१.२०२१.
२. एमसीटी-०१२१/प्र.क्र.०१०/परि-५ दि.१०.०५.२०२१.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई या कार्यालयात विशेष सरकारी वकील या रिक्त पदी नेमणूक करण्याबाबतचे गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

तरी मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई या कार्यालयात शासनाचे व शासकीय कार्यालयाच्या वतीने न्यायाधिकरणापूढे हजर राहून शासनाची बाजू मांडण्यासाठी "विशेष सरकारी वकील" या रिक्त पदासाठी आपल्या बार असोसिएशन मधील इच्छुक वकील / उमेदवारांकडून त्यांची व्यक्तीगत माहिती (Bio-data) व अनुभव तसेच मानधन इत्यादी बाबतचा तपशील स्पष्ट केलेला अर्ज "सचिव, गृहविभाग, परि. ५, मंत्रालय, मुंबई" यांच्या नावे दि.१७.०५.२०२१ ते २३.०५.२०२१ पर्यंत या कार्यालयात सादर करावेत. सदरचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर मा. अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई यांच्या अभिप्रायासह शासनाकडे पाठविण्यात येतील, सबब वरील विषयी आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(अ.कि. गायकवाड)
प्रभारी प्रबंधक,
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
मुंबई

Scanned with CamScanner